पनवेल (प्रतिनिधी) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जनसंपर्क कार्यालयांच्या माध्यमातून जनसेवा करण्याचे प्रामाणिक काम होत आहे, असे प्रतिपादन कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा खारघर शहर प्रभारी वाय.टी.देशमुख यांनी येथे बुधवारी केले. खारघर शहरातील सेक्टर १८ मधील प्रभाग सहामध्ये सुरू करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय व विभागीय कॉंग्रेस कमिटी कार्या लयाचे उदघाटन तसेच गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत वहया वाटप माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

वाय.टी.देशमुख पुढे म्हणाले की, आमदार प्रशांत ठाकूर यांनी शैक्षणिक फि वाढी विरोधात खारघमध्ये आंदोलन उभारून शासनाला फि संदर्भात योग्य धोरण ठरविण्यास भाग पाडले.त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना व पालकांना मोठा दिलासा देण्याचे महत्वपूर्ण काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले आहे. आमदार प्रशांत ठाकूर अहोरात्र जनतेच्या सेवेसाठी सतत कार्यरत असल्याने सामाजिक सेवेचा व्रत घेतलेला आमदार म्हणून त्यांची सर्वत्र ओळख निर्माण झाली आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, प्रशासकयि इमारत, न्यायालय इमारत, नाटयगृह, भुयारी गटार योजना, रस्ते, उडडाणपूल अशा अनेक विकासकामांनी पनवेलला विकासमय करण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले असून सिडकोच्या माध्यमातून खारघरमधील जनतेला सोयीसुविधा मिळवून देण्याचे आणि त्यांच्या समस्या सोडविण्याचे कामही त्यांनी सातत्याने केले आहे, असेही वाय.टी.देशमुख यांनी सांगितले.

आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून येथील जनतेची गाऱ्हाणे त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी उपयोग होईल. त्यांनी केलेल्या विकासकामांची पोचपावती देवून येथील नागरिक प्रशांत ठाकूर यांना पुन्हा आमदार करतील, असा विश्वास खारघर शहर कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सुनिल सावर्डेकर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला. तर समाजसेवक उमेश पाटील म्हणाले की, वारकऱ्यांची एक वारी पंढरीकडे निघाली आहे त्याचप्रमाणे दुसरी वारी सामान्य जनतेच्या दुःखांवर मायेची फुंकर घालणाऱ्या लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक वारस प्रशांतदादांना पुन्हा विधानसभेत पाठविण्यासाठी सज्ज झाली आहे.

यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते झनक सिंग, साधना पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सेक्टर १६ कॉंग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.यामध्ये अध्यक्ष म्हणून दत्तात्रेय भोसले, उपाध्यक्ष किसन पवार, खडगी कृष्णा, सचिव शंकर काळे, किशोर जाधव, खजिनदार अजय जाधव, सहखजिनदार वसंत वर्पे, सदस्य म्हणून राजाराम माने, शामराव माने, लक्ष्मण तोतरे, विजया सरनार आणि तेजश्री जाधव यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

कार्यक्रमास खारघर कॉंग्रेसचे अध्यक्ष अनंता तोडेकर, महिला अध्यक्षा कुंदा मेंगडे, तालुका चिटणीस रामदास नारकर, महिला तालुका कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर, तळोजा कॉंग्रेसचे जि.प.विभागीय अध्यक्ष प्रभाकर जोशी, ॲड.जे.पी.खारगे, रूपाली जैन, विनोद ठाकूर, किशोर जाधव,गुरूनाथ म्हात्रे, प्रकाश ओव्हाळ, के.पी.सिंग, अजय जाधव, रामचंद्र वाघ, गौरव तांबे, महेश जगताप, रामचंद्र पाटील, शंकर काळे, दिपक शिंदे, संतोष वावळ, पुंडलिक नलावडे, जनाब शेख, दत्तात्रेय भोसले, चौधर मॅडम, वसंत भोसले आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.